टेलिफोन नं.: २३०२३९००
फॅक्स नं. : ०२२-२३०८६३५२
ई-मेल : stcour@rediffmail.com

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

कर्मचारीवर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८

## सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत चालक तथा वाहक (कनिष्ठ) पदाच्या कोकण प्रदेशांतर्गत दिनांक ०२ जुलै, २०१७ रोजी घ्यावयाच्या लेखी परीक्षा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक तथा वाहक (कनिष्ठ) पदाकरिता उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदाकरिता मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदूर्ग या विभागांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांकरीता दिनांक ०२.०७.२०१७ रोजी लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे. उमेदवारांनी ज्या विभागाकरीता अर्ज केला आहे त्याच विभागात किंवा लगतच्या विभागात सदर लेखी परिक्षा घेण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच इतर पदांबाबत लवकरच लेखी परिक्षेचे आयोजन करण्यांत येईल .

परीक्षेसंदर्भातील उमेदवारांचे प्रवेशपत्र, बैठक क्रमांक, परीक्षा केंद्राबाबतचा तपशिल उमेदवारांना ईमेलद्वारे व एस.एम.एस.द्वारे कळविण्यात येईल. तसेच उमेदवारांनी त्यांच्या पासवर्डचा वापर करुन संकेतस्थळावरील लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र प्रिंट करुन घ्यावे व त्यामध्ये दिलेल्या सुचनांनुसार लेखी परीक्षेकरीता हजर रहावे व त्यामधील सुचनांचे पालन करावे.

चालक तथा वाहक (कनिष्ठ) पदाची लेखी परीक्षा वरीलप्रमाणे घेण्यात येणार असून उमेदवारांनी खालील आवाहनाची नोंद घ्यावी.

"या भरतीप्रक्रियेबद्दल व लेखी परीक्षेसंदर्भात अफवा पसरवून उमेदवारांना निवड करुन देण्याचे प्रलोभन दाखवून, उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्यास अशा अफवा व प्रलोभनास उमेदवारांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी बळी पडू नये व अफवा पसरविणा-यांवर विश्वास ठेवू नये. अशा अपप्रवृत्तीच्या लोकांकडून उमेदवारांशी संपर्क साधण्यात आल्यास त्याबाबत विनाविलंब रा.प.महामंडळाच्या संबंधित विभाग नियंत्रक यांचेशी संपर्क साधण्यात यावा. तसेच, स्थानिक पोलिस स्टेशन व लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडे तक्रार दाखल करावी. सदरची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यास रा.प.महामंडळास सहकार्य करावे, असे रा.प.महामंडळातर्फे जनतेस जाहीर आवाहन करण्यात येत आहे."

सही/-
(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)